पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १६

**सभावृत्तांत**

दिनांक - **२२/१२/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२२/१२/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते - सभापती**
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ - उपसभापती
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.फुगे भिमाबाई पोपट
६. मा.अड.भोसले सचिन सुरेश

या शिवाय मा.लोणकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) रामभाऊ भिमाजी तरस व्यायामशाळा, किवळे मुदतवाढ देणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) श्री.महेंद्र महादेव चव्हाण यांना आर्थिक सहाय्य अदा करणेबाबत – मा.भिमाबाई फुगे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) प्रबोधनकार ठाकरे फिटनेस सेंटर ही व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) कै.तानाजी गावडे व्यायामशाळा चालविण्यास देणेबाबत – मा.राजेंद्र गावडे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान हॉल सेक्टर २६ निगडी हॉल भाडेतत्वावर चालविणेस देणेबाबत – मा.राजेंद्र गावडे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

---------

अ) दिनांक **२४/११/२०१७** व **०८/१२/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १४)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

आ)दिनांक **०८/१२/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १५)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ७९ विषय क्रमांक - ०१

दिनांक - २२/१२/२०१७ विभाग - क्रीडा

सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/कॅश/कावि/१४१/२०१७, दि.२७/११/२०१७

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी या ट्रस्टद्वारे ह्रद्यरोग, कॅन्सर, किडनी, मेंदूचे आजार, दुर्धर आजार, गंभीर अपघातग्रस्त आणि दुर्धर आजारांनी ग्रासलेल्या रूग्णांना तसेच नैसर्गिक आपत्ती पिडीतांना मदत म्हणून महापालिकेकडून प्रतिवर्षी मिळणा-या र.रू.२५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंचवीस लाख फक्त) या अनुदान रकमेतून अर्थसहाय्य केले जाते. शासन निर्णय क्र.पीसीसी ३००६/१९९७ प्र.क्र.३९७/नवि-२२ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि.१८/१२/२००७ अन्वये या ट्रस्टला दरवर्षी २५ लाख एवढे अनुदान देणेस मान्यता दिलेली आहे. तरी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेस र.रु.२५ लाख अनुदान देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८० विषय क्रमांक - ०२

दिनांक - २२/१२/२०१७

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

किवळे गावठाण येथील रामभाऊ भिमाजी तरस ही व्यायामशाळा श्री.बापदेव महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था, मर्यादित या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविणेस मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८१ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २२/१२/२०१७

सुचक : मा. भिमाबाई फुगे अनुमोदक : मा. बाळासाहेब ओव्हाळ

संदर्भ : मा.भिमाबाई फुगे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

श्री.महेंद्र महादेव चव्हाण, स.नं.१७, बी उष:काल सोसायटी, सांगवी, पुणे – २७ यांनी दि.२०/१२/२०१७ चे पत्रान्वये Ulaanhaatar, Mangolia येथे झालेल्या 9th World Bodybuilding & Physique Sports Championships 2017, स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केल्यामुळे आर्थिक सहाय्य मिळणेची विनंती केलेली आहे. मा.महापालिका सभा ठराव क्रमांक १०८३, दि.१८/०२/२०११ अन्वये राष्ट्रकुल / एशियन / ऑलंपिक सहभागी झालेल्या खुल्या वरिष्ठ गटातील खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती अदा करण्यात येईल तसेच " राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंना अर्थसहाय्य " हे लेखाशिर्ष सन २०११-१२ या आर्थिक

वर्षापासून नव्याने सुरु करुन सदर लेखाशिर्षावर तरतूद र.रु.१०,००,०००/- उपलब्ध करुन देणेची शिफारस करणेत आली आहे. त्यामध्ये प्रपत्र अ-६ मधील अ.क्र.३ तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धा व अ.क्र.४ स्पर्धा प्रकारामध्ये SAF (सॅफ गेम) Winter Olympic या स्पर्धांचा समावेश करणेची दुरुस्ती करुन त्या दुरूस्तीसह त्याप्रमाणे त्यास मान्यता देण्यात यावी अशी शिफारस करणेत आली आहे. त्यामध्ये योगासन व मलखांब या खेळांचा समावेश करणेत यावा, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय क्रींडा स्पर्धेत ज्या स्पर्धकांची निवड होईल व जे पिंपरी चिंचवड मनपामधील पाच वर्षे रहिवाशी असतील अशा स्पर्धकांचा व मनपाच्या क्रीडा प्रबोधिनीतील विद्यार्थ्यांपैकी ज्याची स्पर्धेत निवड होईल अशा विद्यार्थ्यांचा सर्व खर्च मनपातर्फे करणेची १ जून ते ३० जून व १ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या महिन्यामध्ये निम्या निम्या रकमेचे वाटप करणेची दुरुस्ती करुन त्यासह त्याप्रमाणे मान्यता दिलेली आहे. या मध्ये Winter Olympic वगळून कार्यवाही करावी असे धोरण आहे. क्रीडा धोरणात जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूस र.रु.३,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करण्याचे धोरण आहे. श्री.महेंद्र महादेव चव्हाण, स.नं.१७, बी उष:काल सोसायटी, सांगवी, पुणे – २७ यांनी दि.२०/१२/२०१७ चे पत्रान्वये Ulaanhaatar, Mangolia येथे झालेल्या 9th World Bodybuilding & Physique Sports Championships 2017, स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केल्याने त्यांना आर्थिक सहाय्य र.रु.२,९५,०००/- (अक्षरी र.रु.दोन लाख पंच्याण्णव हजार फक्त) अदा करणेस मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८२ विषय क्रमांक - ०४

दिनांक - २२/१२/२०१७

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१४ मधील प्रबोधनकार ठाकरे फिटनेस सेंटर ही व्यायामशाळा अष्टविनायक महिला प्रतिष्ठान या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८३ विषय क्रमांक - ०५

दिनांक - २२/१२/२०१७

सुचक : मा.राजेंद्र गावडे अनुमोदक : मा.बाळासाहेब ओव्हाळ

संदर्भ : मा.राजेंद्र गावडे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१८ मधील कै.तानाजी गावडे व्यायामशाळा ही सरदार गावडे प्रतिष्ठान या संस्थेस ११ महिन्याच्या कार्यकालासाठी चालविण्यास देण्याचा ठराव केला होता. परंतु सदर संस्था ही व्यायामशाळा चालविण्यास घेण्यास तयार नाही. तरी सदर व्यायामशाळा ही कजरी महिला बचत गट या संस्थेस र.रु.२,०००/- सेवाशुल्क मनपाकडून घेऊन ११ महिन्याच्या कराराने चालविण्यास देण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८४ विषय क्रमांक - ०६

दिनांक - २२/१२/२०१७

सुचक : मा.राजेंद्र गावडे अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.राजेंद्र गावडे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

महानगरपालिकेचे स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान हॉल, सेक्टर २६, निगडी हा टेनिस कोर्ट जवळील हॉल व्हेरॉको फाऊंडेशन, आकुर्डी या संस्थेस भाडेतत्वावर चालविण्यास देण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **लक्ष्मणशेठ सोपान सस्ते** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१३४४/२०१७
दिनांक : ३०/१२/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.